लोकमत – २५/०१/२००८

# दरबार – संगीतासाठी पाण्यातील रंगमंच



रसिकनगरी पुण्यात संगीताचा कार्यक्रम करणे हे कलावंतांसाठीही मानाचे असते आणि रसिकांसाठीही मानाचे असते आणि रसिकांसाठी आनंदाचे. याच आनंदपर्वात आता पाण्यातील रंगमंचाने अधिक भर घातली आहे.

एमआयटी संस्थेने मुळा–मुठा नदीवर लोणी काळभोर येथील राजबाग येथे ‘विश्वराज बंधारा’ निर्माण करून त्यावर ‘श्रीमहासरस्वती’, ‘श्रीमहालक्ष्मी’, ‘श्रीमहाजलदेवता’ या मेघडंबरी उभारल्या आहेत. त्या मेघडंबरीतून विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांच्या प्रेरणेतून हा रंगमंच साकारला आहे. संगीताच्या सुरावटींना आता पाण्याच्या संथ लहरींचीही साथ मिळणार आहे. पाण्यात असलेल्या या मेघडंबरीमध्ये जावे लागेल ते अर्थातच नौकेतून. कलाकार आपली कला मध्यवर्ती असलेल्या मंचातून कला सादर करतील.

कला ही भावनात्मकतेची उत्कट व परमोच्च अनुभूती असते. ही कला निसर्गाच्या सानिध्यात अधिकच फुलते. संथ पाण्याच्या शांत वातावरणात त्याला अधिक बहर येतो, असा अनेक कलाकारांचा अनुभव आहे. हीच अनुभूती आता रसिकांना या पाण्यातील रंगमंचावर मिळेल.

नुकत्याच या मंचावरुन शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम सादर झाला. त्यामध्ये प. हृदयनाथ मंगेशकर, श्रीकांत देशपांडे, राहूल देशपांडे उपेंद्र भट यांचे गायन, उस्ताद शुजातखाँ याचे सतारवादन, बाहाउद्दीन डागर यांचे रुद्रवीणा वादन झाले. तसेच, सुहासिनी नांदगांवकर, संजय टंडन, अरविंद गजेंद्रगडकर, पुष्कर लेले यांनीही गायन–वादन सादर केले.

गोदावरी मुंडे, रमेश शेनगांवकर यांनी भजन सादर केले. अशोक कदम यांची ढोलकी व हरी बागडे यांचे मृदुंग वादनाचा ‘द्विदल’ हा कार्यक्रमही यावेळी झाला. पं. हरीप्रसाद चौरासिया यांच्या बासरी वादनाच्या कार्यक्रमाने व पं. शिवकुमार शर्मा यांच्या संतुर वादनाने रसिकांचे मन जिंकले. केशवराव बडगे यांनी ‘संत ज्ञानेश्वरांचा गोंधळ’ सादर करून रसिकांची दादा मिळवली. रमाकांत व उमाकांत गुंदेचा बंधुनी ध्रुपद गायन सादर केले.

सध्या सगळीकडे जलद ऱ्हीदम असणाऱ्या संगीतालाच मोठी मागणी असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे विविध क्लब, उपहारगृहे येथे इंग्रजी संगीताला व त्याच्या वळणावर जाणाऱ्या संगीतालाच अधिक मागणी असल्याचे दिसते. अशा या वातावरणात भारतीय संगीताला त्याच्यातील भावात्मक बंध फुलविणारे हे व्यासपीठ नक्कीच वेगळेपण ठरेल. कारण या मंचावर दरवर्षी ३०–३१ डिसेंबरला शास्त्रीय गायन–वादनाचा कार्यक्रम सादर होणार आहे.

- वसुधा जोशी